## सूची


| उपविधी क्रमांक | शिर्षक |
| --- | --- |
| | स्थानिक नागरी संस्थेसाठी आदर्श उपविधी |
| | व्याखा - विभाग 'अ' – कचरा व मलप्रवाह उपविधी |
| १. | उपविधींची प्रयोज्यता |
| २. | कच-याचे विसर्जन |
| ३. | उपविधींची अंमलबजावणी |
| ४. | परवानगी देणे |
| ५. | कच-याची चाचणी आणि त्यांचे निकाल |
| ६. | विसर्जित केलेल्या मलप्रवाहाच्या चाचणीबाबतची सूचना |
| ७. | ग्रे पाणी पुनर्चक्रीकरण प्रक्रिया संयंत्रासाठी प्रचालन परवानगी |
| ८. | ग्रे पाण्याचे पृथःकरण |
| ९ | कच-याचे सशर्त विसर्जन |
| १० | बदलाबाबतच्या अनिवार्य सूचना |
| ११ | परवाना/सूचनांच्या अटींमध्ये बदल करावयाचा अधिकार |
| १२ | अधिका-यांबरोबर मध्यस्थी |
| १३ | सूचना/परवान्यांचे वाटप |
| १४ | सुधार कृती |
| १५ | अधिका-यांचे प्राधिकार पत्र |
| | व्याख्या - विभाग 'ब' जल उत्तेजन उपविधी |
| १६ | ग्रे पाण्यासाठी स्वतंत्र पाईपमार्ग व नवीन इमारतींसाठी पुनर्चक्रीकरणाची तरतूद |
| १७ | ग्रे पाण्यासाठी स्वतंत्र पाईपमार्ग व विद्यमान इमारतींसाठी पुनर्चक्रीकरणाची तरतूद |
| १८ | पाण्याचा पुनर्वापर काटेकोरपणे पिण्यासाठी नसावा |
| १९ | पिण्यासाठी असलेल्या व पिण्यासाठी नसलेल्या पाण्याची काटजोडणी (Cross Connection) नसावी |
| २० | पुनर्चक्रांकित पाण्याचे मोजमाप |
| २१ | जलकरात सूट |
| २२ | मलनिःसारण करात सूट |
| २३ | वादांचे निराकरण |

# प्रस्तावना

आवश्यकतेनुसार विविध प्रसंगांना साजेसे विविध प्रकारचे परिधान उपयोगात येतात. कमीत कमी किमतीला विविध पातळीवर पुनर्चक्रीकरण केलेले पाणी विविध प्रकारे त्याच्या पिण्याच्या दर्जाचे आश्वासन न देता वापरणे शक्य आहे. उच्च दर्जाचे पिण्यायोग्य पाणी वेगाने प्रसाधनगृहात टाकणे (Flush) गाडया धुणे, बागकाम इत्यादिसाठी न वापरणे हे दूरदृष्टीने शहाणपणाचे आहे.

मध्यम गाळलेले पाणी वापरुन असे हेतू साध्य करता येऊ शकतील. अशा विचारपूर्वक कार्यवाहीमुळे फक्त बहुमूल्य पाणीच वाचणार नाही तर जलवाहिन्या, मलवाहिन्या, जलप्रक्रिया प्रकल्प आणि पर्यायाने पर्यावरणाचे सुध्दा आयुर्मान वाढेल.

निसर्गातील जीवसृष्टी जिवंत राहण्यासाठी अनेक नैसर्गिक स्त्रोतांचा उपयोग अशा प्रकारे होणे आवश्यक आहे की त्यामुळे ते अधिक कालावधीपर्यंत उपलब्ध होतील ही काळाची गरज आहे. उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पाण्यावर पुनर्चक्रीकरण करणे हा एक मार्ग आहे.

पाण्याची कमतरता, वाढती लोकसंख्या जलशुध्दीकरणाचा वाढता खर्च, पाणी वाटपाचा खर्च मलप्रवाहाची विल्हेवाट लावणे आणि पर्यावरणाचे रक्षण करणे, इत्यादी बाबी विचारात घेऊन ग्रे पाण्यावर पुनर्चक्रीकरण करण्यासाठीच्या उपविधींची आखणी करण्यात आली आहे.

बहुकेंद्री निवासी व व्यावसायिक इमारतीतील ग्रे पाण्यावर पुनर्चक्रीकरण करण्यास हे उपविधी मार्गदर्शक आहेत. इमारत बांधकाम उद्योग प्रणाली संकलपक, चालक व नियंत्रक यांना उपयोग व्हावा असा हेतू आहे.

ग्रे पाणी पुनर्चक्रीकरणाच्या हया उपविधीचा हेतू असा आहे की सतत योग्य दर्जाच्या पाण्याचा पुरवठा होईल आणि पाण्याची काट जोडणी (Cross connection) किंवा पाण्याचा अयोग्य वापर टाळण्यासाठी त्यात पुरेशी व्यवस्था आहे.

जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान मंडळांतर्गत आर्थिक मदत मागताना केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्याशी केलेल्या लेखी संमती ज्ञापनात नमूद केलेल्या बांधिलकीचा एक भाग म्हणून मुंबई महानगरपालिकेने हे पाऊल उचलले आहे. निवासी इमारतीतील ग्रे पाणी व काळे पाणी यांचे पुनर्चक्रीकरण हा संमती ज्ञापनातील पर्यावरणसापेक्ष (Eco Housing) घरांचा एक भाग आहे.

महानगरपालिकेच्या हद्दीतील निवासी व व्यापारी इमारतींमध्ये ग्रे पाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर प्रवर्तित करण्यासाठी व त्यात नियमितता आणण्यासाठी विशिष्ट उपविधी असणे अपेक्षित

आहे. तथापि पुनर्चक्रीकरणाच्या दृष्टीने दोन्ही विभागासाठीची बाब एकच आहे. त्यामुळे सामाईक उपविधी प्रस्ताविले आहेत.

परिशिष्ट 'अ' उपविधीमध्ये प्रस्ताविल्याप्रमाणे संकल्पनात्मक ग्रे पाण्याच्या पुनर्वापराची मांडणी

परिशिष्ट 'ब' ग्रे पाणी पुनर्चक्रीकरण केंद्रातून वाहून जाणा-या पाण्याची वैशिष्ट्ये

नागरी स्थानिक संस्थेसाठी आदर्श नियमावली

(ग्रे पाणी पुनर्चक्रीकरण व जल उतेजन उपविधी)

a) ग्रे पाण्यातील कच-याचे/व्यावसायिक कच-याचे किंवा इतर कच-याचे दीर्घ कालावधीसाठी, अनियमित कालावधीसाठी किंवा तात्पुरते ग्रे पाण्यात/मलनिःसारण यंत्रणेत विसर्जन करण्यास मान्यता देणे.

b) बाबींनुसार व्यावसायिक कच-याच्या दर्जाची नियंत्रित कचरा/सशर्त कचरा आणि मनाई केलेला कचरा अशी प्रतवारी ठरविणे.

c) विशेष कसोटीनुसार घरगुती/व्यावसायिक ग्रे पाणी विसर्जनाची वर्गवारी

d) मलप्रवाह व ग्रे पाण्याचा पिण्याव्यतिरिक्त इतर वापरासाठी पुनर्वापर करण्याची मान्यता देण्यापूर्वी त्यावर पूर्वप्रक्रिया करणे

e) मलप्रवाह पुनर्चक्रीत पाणी आणि औद्योगिक कच-याचे विसर्जन यांचा प्रवाह व दर्जा यांचे मोजमाप करण्यासाठी प्रवाहमापक नमुने गोळा करणारे यंत्र किंवा इतर सामग्रीची स्थापना करणे.

f) मलनिःसारण यंत्रणेत विसर्जनासाठी मान्यता देण्यापूर्वी वर्गीकरणाप्रमाणे ग्रे पाणी व मलप्रवाह यांच्यावर पूर्वप्रक्रिया करणे.

g) पिण्यायोग्य व न पिण्यायोग्य पाणी यांचे स्वतंत्र नळकाम

h) उपविधीमधील अटींच्या अंमलबजावणीची खातरजमा करण्यासाठी औद्योगिक कच-याच्या विसर्जनाचे नमुने गोळा करणे व त्यावर लक्ष ठेवणे.

i) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे पुनर्चक्रीकरण पध्दतीसाठी औद्योगिक कचरा विसर्जन करण्यास मान्यता देणे अथवा नकार देणे.

j) प्रशासनांचा आणि संनियंत्रणाचा खर्च भागविण्यासाठी कर लादणे

k) औद्योगिक कचरा व घरगुती कचरा निर्मात्यासाठी कचरा कमी करणे व व्यवस्थापन कार्यक्रम आखणे

l) पुनर्चक्रीकरण प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पिण्याव्यतिरिक्त वापर करण्यास प्रोत्साहन देणे.

m) पुनर्चक्रीत पाणी पिण्याव्यतिरिक्त वापरण्यासाठी जकातकर व मलनिःसारण करात फायदे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीसाठी हे आदर्श उपविधी बनविण्यात आले आहेत. हे आदर्श उपविधी राज्यातील नागरी स्थानिक प्राधिकरण आणि भारतातील केंद्रशासित प्रदेशाकडे शिफारस करण्यासाठी वापरले जातील.

<u>व्याख्या</u>

**1.** या उपविधीमध्ये

"प्रवेश बिंदू" म्हणजे अशी जागा जेथून महानगरपालिकेच्या प्रमाणकाच्या गरजा पूर्ण करणा-या खाजगी मलनिःसारण वाहिनीच्या निरिक्षणासाठी, सफाईसाठी व परिरक्षणासाठी प्रवेश मिळेल. (यात नमुने किंवा मोजमाप समाविष्ट असेल) आणि त्याला "विसर्जन" पूर्वीचे मुखद्वार संबोधले जाईल.

"मान्य" म्हणजे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्राधिकृत अधिका-याने दिलेली लेखी मान्यता.

"प्राधिकृत अधिकारी" म्हणजे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महापालिका आयुक्तांनी उपविधी अंतर्गत प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती.

"वैशिष्टय" म्हणजे अनुसूची 'ब' मध्ये संदर्भित केलेल्या व्यावसियक ग्रे पाणी/घरगुती ग्रे पाण्याचे भौतिक व रासायनिक वैशिष्टये.

"विसर्जन व्यवस्थापन आराखडा" म्हणजे महानगरपालिका मलनिःसारण प्रणालीच्या पुनर्चक्रीत पाणी प्रक्रिया केंद्रातून बाहेर पडणा-या आणि महापालिकेच्या मलप्रवाह यंत्रणेत विसर्जित होणा-या पाण्याचे संनियंत्रण योजना व नियंत्रण करणारा आराखडा. "विसर्जन" किंवा "कच-याचे विसर्जन" म्हणजे इमारतीतील कचरा ग्रे पाणी यंत्रणेत (System) हलविणे किंवा यंत्रणेच्या सहाय्याने हलविणे.

"तोडणे" म्हणजे ग्रे पाणी यंत्रणेपासून खाजगी मलप्रवाह वाहिनी प्रत्यक्ष तोडणे आणि/अथवा मोहोरबंद करणे (Seal) "घरगुती ग्रे पाणी" म्हणजे फक्त निवासी वापरातूनच विसर्जित झालेले ठराविक प्रकारचे ग्रे पाणी किंवा इतर आवारातून विसर्जित झालेले त्याच प्रकारचे ग्रे पाणी म्हणजे जलकूंड (Sinks) टब, स्नान व धुणे याकरिता वापरलेल्या पाण्याचा यात अंतर्भाव आहे. "औद्योगिक/व्यावसायिक आवार" म्हणजे कोणतेही आवार ज्याचा वापर (फायद्याकरिता अथवा फायद्याव्यतिरिक्त कोणताही व्यापार, व्यवसाय, शिक्षण, संशोधन अथवा उद्योग चालविण्यासाठी केला जात आहे अथवा करण्यात येणार आहे.

व्यावसायिक कचरा किंवा कचरा म्हणजे एखादया व्यावसायिक केंद्रातून काढून टाकलेला कचरा किंवा इतर आवारातून विसर्जित केलेले द्रवरुप ग्रे पाणी ज्यात द्राव्य अथवा विद्राव्य पदार्थ

आहेत किंवा व्यावसायिक आवारातून कोणताही व्यापार अथवा व्यवसायाची प्रक्रिया किंवा प्रचालन सुरु असताना किंवा एखादी प्राकृतिक क्रिया किंवा सारख्याच प्रकारचे प्रचालन सुरु असताना सोडण्यात येणारे ग्रे पाणी**.**

**"**निरिक्षक**"** म्हणजे महापालिका आयुक्तांनी या उपविधीसाठी लेखी स्वरुपात नेमणूक केली आहे असा कोणीही**.**

"ISO 5667" म्हणजे आंतराराष्ट्रीय प्रमाणक ISO 5667-**1994** पाण्याचा दर्जा – नमुने यांच्या कोणत्याही सुधारणेसह संपूर्ण नवीनतम आवृत्ती**.**

भाग **1 – 1980** नमुना गोळा करण्याच्या कार्यक्रमांच्या आखणीबाबत मार्गदर्शन

भाग **2 - 1991** नमुना गोळा करण्याच्या तंत्राबाबत मार्गदर्शन

भाग **3 – 1994** नमुना हाताळण्याबाबत व जतन करण्याबात मार्गदर्शन

भाग **10- 1992** ग्रे पाण्याच्या नमुन्याबाबत मार्गदर्शन

**"**ISOTR 9824**"** म्हणजे आंतरराष्ट्रीय प्रमाणक ISOTR 9824 उघडया जलमार्गातून वाहणा**-**या द्रवाचे मोजमाप यांच्या कोणत्याही सुधारणेसह संपूर्ण नवीन आवृत्ती**.**

भाग **1 - 1990** बंद नलिकांमधील मोकळा पृष्ठ प्रवाह मोजण्याच्या पध्दती

भाग **2 – 1990** बंद नलिकांमधील मोकळा पृष्ठ प्रवाह मोजण्याची सामग्री

**"**प्रयोगशाळा**"** म्हणजे औद्योगिक ग्रे पाणी अथवा इतर ग्रे पाणी नमुन्यांची चाचणी करण्यासाठी परवानगी दिलेली संस्था हया उपविधीच्या हेतूसाठी

**"**परवाना**"** म्हणजे औद्योगिक ग्रे पाणी अथवा इतर ग्रे पाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी महानगरपालिका आयुक्तांनी लेखी स्वरुपात दिलेली परवानगी जिथे निर्गमित केल्यानंतर वार्षिक नुतनीकरण केले जाते**.**

**"**एकत्र गोळा होण्याची मर्यादा**"** म्हणजे विसर्जनाच्या कोणत्याही एका जागेवरुन किंवा विविध जागांवरुन एकत्रितपणे **24** तासांच्या कालावधीत कोणत्याही गुणधर्माचे एकत्र गोळा झालेले ग्रे पाणी ज्यास ग्रे पाणी प्रणालीमध्ये सोडण्यास परवानगी देता येईल**.**

**"**जास्तीत जास्त संहतीकरण**"** म्हणजे कोणत्याही गुणधर्माचे उल्लंघन होणार नाही असे ग्रे पाण्यातील अत्युच्च संहतीकरण**.**

**"**सूचना**"** म्हणजे महापालिका आयुक्तांनी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका**-**यांनी मालमत्ता दावेदारांना आवारात पुनर्चक्रीत सुविधा पुरविण्यासाठी निर्गमित केलेले लेखी पत्र**.**

"ताबेदार" म्हणजे कोणीही एखादा जो आद्योगिक केंद्र, निवासी संकुल किंवा आवार हयाच्यासाठी मालक म्हणून किंवा भाडेतत्वावर किंवा भाडेपट्टयावर किंवा इतर कोणत्याही मार्गाने एखादया उद्योग/आवार किंवा त्यातील काही भाग ताब्यात असेल तर त्याला तावेदार म्हणतात.

"व्यक्ती" म्हणजे केवल, महानगरपालिका आणि त्याचप्रमाणे मंडळ जसे संयुक्त निगम अथवा संस्थापित किंवा भागीदारी संस्था.

"विसर्जन ठिकाण" म्हणजे असे प्रत्यक्ष ठिकाण जेथे व्यावसायिक ग्रे पाणी, ग्रे पाणी प्रणाली मध्ये प्रवेश करते.

"पूर्व प्रक्रिया" प्रणालीत सोडण्यापूर्वी व्यावसायिक ग्रे पाणी अथवा ग्रे पाण्यातील कोणतेही गुणधर्म कमी करण्यासाठी केलेली आखणी.

आवार म्हणजे

अ) अशी मालमत्ता जी एका वेगळया शिर्षक पत्राखाली घेतली आहे किंवा ज्यासाठी वेगळे शिर्षकपत्र देता येऊ शकेल आणि ज्याकरिता इमारत आराखडा देण्यात आला आहे किंवा देता येऊ शकेल किंवा

ब) अशी इमारत जी काट भाडेपट्टयाने (cross lease) किंवा कंपनी भाडेपट्टयाने (company lease) वैयक्तिकरित्या ताब्यात आहे आणि ज्याकरिता शिर्षक प्रमाणपत्र उपलब्ध आहे किंवा

क) विशिष्ट कारणासाठी ताब्यात असलेली सार्वजनिक मालकीची जमीन किंवा

ड) इमारतीमधील प्रत्येकाला स्वतंत्रपणे केलेली महानगरपालिका कर आकारणी.

"खाजगी" मलनिःसारणी म्हणजे आवार आणि मलनिःसारण प्रणाली यांच्यामधील भाग.

"निषिध्द औद्योगिक ग्रे पाणी" म्हणजे या उपविधीच्या परिशिष्ट ब मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, जास्तीचे भौतिक आणि रासायनिक गुणधर्म असलेले औद्योगिक ग्रे पाणी.

"जाहीर निवेदन" म्हणजे महानगरपालिका हद्दीत वितरीत केल्या जाणा-या वृत्तपत्रात एकदा तरी प्रकाशित करण्यात आलेले किंवा आणिबाणीच्या परिस्थितीत त्यावेळेस प्रत्यक्षात उपलब्ध असलेले साधन.

"प्राप्त होणारे पाणी" म्हणजे किना-यावरील किंवा नैसर्गिक पाणी जे प्रक्रिया केलेले ग्रे पाणी घेईल.

"मलनिःसारण प्रणाली" म्हणजे स्थानिक नागरी संस्थेच्या मालकीच्या असलेल्या सर्व प्रकारच्या मलनिःसारण्या, संलग्न वाहिन्या, उदंचन केंद्र, साठवणूक टाक्या, ग्रे पाणी प्र सुविधा केंद्र,

सागरी पातमुख आणि इतर संबंधित संरचना ज्याचा वापर ग्रे पाणी स्विकारणे, प्रक्रिया व विल्हेवाट लावण्यासाठी केला जातो आणि त्याला ग्रे पाणी  प्रणाली असेही म्हणतात.

"पाणी व ग्रे पाणी परिक्षणासाठी आदर्श पध्दती" म्हणजे प्रदूषण नियंत्रक मंडळातर्फे प्रकाशित करण्यात आलेली सर्व सुधारणा व पुरवण्या यांनी युक्त असलेली नवीनतम आवृत्ती.

"पावसाळी पाणी" म्हणजे अवक्षेपणाच्या अंती (Precipitation) सर्व पृष्ठभागावरुन वाहणारे पाणी.

"तात्पुरते विसर्जन" म्हणजे मधून-मधून खंडीत होणारे किंवा कमी कालावधीकरिताचे विसर्जन.  हया विसर्जनामध्ये परवाना असण्यासापेक्ष आवारातील असाधारण ग्रे पाण्याचे कमी कालावधीकरिताचे विसर्जन आणि भांडी तयार करण्यापासून निघणा-या ग्रे पाणी विसर्जनाचा अंतर्भाव आहे.

"स्थानिक नागरी प्राधिकारण" म्हणजे भारतीय घटनेचे कलम **243** क्यु शी तादात्म्य राखून एखादया नगराचे स्थानिय पालिका प्राधिकरण, प्रादेशिक परिषद किंवा नगरांचा समुदाय.

"ग्रे पाणी" म्हणजे हया उपविधीनुसार मैला अंतभूत असलेले द्रावणीय, अद्रावणीय, निवासी ग्रे पाणी किंवा द्रवरुप ग्रे पाणी असलेले पाणी.

"कमीत कमी ग्रे पाणी करणे" म्हणजे ग्रे पाण्याचे प्रमाण व त्याचा विषारीपणा कमी करणे वा काढून टाकणेच्या उद्दिष्टाने व्यावसायिक आवारातील ग्रे पाण्यावर प्रचालन व निर्बंध लागू करणे.

"ग्रे पाणी प्रणली" म्हणजे स्थानिक नागरी संस्थेच्या मालकीच्या असलेल्या सर्व प्रकारच्या मलनिःसारण्या, संलग्न वाहिन्या, उदंचन केंद्र, साठवणूक टाक्या, ग्रे पाणी प्रक्रिया सुविधा केंद्र, सागरी पातमुख आणि इतर संबंधित संरचना ज्याचा वापर ग्रे पाणी स्विकारणे, प्रक्रिया व विल्हेवाट लावण्यासाठी केला जातो आणि त्याला मलनिःसारण प्रणाली असेही म्हणतात.

"परिमंडळे" म्हणजे शहरातील नाला जलग्रहण क्षेत्र.  ज्यांना वेगळया ग्रे पाणी/ग्रे पाणी प्रक्रिया केंद्राकडून सेवा पुरविली जाते.

विभाग ए – ग्रे पाण्याच्या पुनर्वापरासाठीचा उपविधी

**1)** उपविधीची प्रयोज्यता (लागू होणे)

**1.1** खालील प्रवर्गात मोडणा-या सर्व गृहनिर्माण/व्यापारी इमारतींना हे उपविधी लागू आहेत.

प्रवर्ग **1 –** ज्यांचा भूखंड **2000** चौ.मी. पेक्षा जास्त आहे.

प्रवर्ग **2 –** पाण्याचे वाटप प्रतिदिन **60000** लिटर पेक्षा जास्त आहे. भोगवटादार/मालक/सहकारी संस्था यांच्या नांवे एकापेक्षा जास्त पाण्याच्या जोडण्या असतील तर सर्व जोडण्यांच्या पाण्याचे वाटप या उपविधीसाठी विचारात घेतले जाईल.

प्रवर्ग **3 –** कोणत्याही प्रकारची **60** पेक्षा जास्त वस्ती घरे असणा-या इमारती.

विकास नियंत्रण नियमावली **1991** च्या खंड **23(1) (**जी**)** च्या तरतुदींनुसार मनोरंजनासाठीच्या मोकळया जागेत परवानगी असलेल्या बांधकाम/वापर यांसह चटई क्षेत्र निर्देशांक मुक्त मनोरंजनासाठीच्या मोकळया जागेत प्रत्यक्ष संयंत्राची मांडणी केली जाईल. मनोरंजन मैदानात परवानगी असलेल्या सर्व बांधकामासहित जोत्याचे एकूण क्षेत्र मनोरंजन मैदानाच्या क्षेत्राच्या **10** टक्के पेक्षा जास्त नसावे. इमारत रेषेपासून संयंत्र **3** मीटर दूर असावे व आवार भिंतीपासून कमीत कमी **1.5** मीटर अंतरावर असावे. संयंत्राच्या कमाल **8** मीटर एवढया उंचीस परवानगी दिली जाईल. चटईक्षेत्र निर्देशांक मुक्त अशा इमारतींच्या स्टील्टमध्येही संयंत्रास परवानगी दिली जाईल.

**1.2** प्राधिका-यांनी निश्चित केल्यानुसार खालील बाबतीत सूट देता येईल.

अ) प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या वापरासाठी विद्यमान इमारतीवर अतिरिक्त टाकीची तरतूद करण्याची परवानगी देता येत नसेल

ब) विद्यमान बांधकामात प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी व एकत्रीकरणाच्या खोलीसाठी (Collection Chamber) जागा नसेल.

**2)** <u>ग्रे पाण्याची विल्हेवाट</u>

**2.1** इमारतीच्या मालकाने किंवा भोगवटादाराने त्यांच्या इमारतीतीलच ग्रे पाणी/मलप्रवाह मलनिःसारण यंत्रणेत विसर्जित करावा व इतर कोणत्याही व्यक्तिस त्यांच्या इमारतींमधून तो मलनिःसारण यंत्रणेत टाकण्यास परवानगी देऊ नये.

**2.2** परिमाण किंवा दर्जा यामुळे मलनिःसारण यंत्रणेस धक्का पोहोचणार नाही किंवा मलप्रवाहाच्या वहनास अडथळा येणार नाही किंवा त्यांच्या प्रक्रियेस अडथळा येणार नाही अशाच पध्दतीने करावी तसेच महापालिकेकडून प्राप्त झालेल्या पाण्याच्या पुरवठयापेक्षा जास्त असता कामा नये.

**2.3** या उपविधीच्या तरतुदीनुसार वैध परवानगीनेच मालकास ग्रे पाणी/मलप्रवाह महापालिकेच्या प्रवाहास जोडण्यास अनुमती दिली जाईल व ग्रे पाण्याच्या पुनर्चक्रीकरणामुळे मिळणा-या फायदयासाठी दावा करु शकेल.

**2.4** या उप विधीला अनुसरुन मूळतः किंवा पध्दतीने किंवा प्रकाराने घाणेरडया वायूचा उपद्रव होणार नाही किंवा सार्वजनिक धोक्यास कारण होणार नाही.

**2.5** पुनर्चक्रीत पाणी पिण्याव्यतिरिक्त वापरासाठी वापरले जाईल. आवारात स्पर्श न होऊ देण्याचा उद्देश असेल आणि मुंबई महानगरपालिकेच्या मलप्रवाह/ ग्रे पाणी प्रणालीस थेट जोडणी केली जाणार नाही. तथापि, पुनर्चक्रसंयंत्राकडून जमा झालेले ग्रे पाणी जर स्विकार करण्याजोग्या दर्जाचे असेल तर मुंबई महानगरपालिकेच्या मलनिःसारण जाळयास जोडले जाईल.

**3)** <u>उपविधीची अंमलबजावणी</u>

**3.1** विद्यमान मालमत्तांच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्त किंवा प्राधिकृत अधिकारी वापरकर्त्यास विनिर्दिष्ट वेळेत ग्रे पाण्याचा पुनर्वापर करण्याची व्यवस्था करण्याबाबत सूचना पाठवतील.

**3.2** प्रस्तावित/इच्छित/ पुनर्विकासांतर्गत असलेल्या मालमत्तांच्या बाबतीत वापरकर्ता/विकासक/ बांधकाम व्यावसायिक महानगरपालिका आयुक्तांना थेट किंवा प्राधिकृत सल्लागारांकरवी प्रस्तावित "विसर्जन व्यवस्थापन योजनेच्या" सविस्तर माहितीसह अर्ज सादर करतील व त्यासोबत पाण्याच्या मागणीसाठी व ग्रे पाणी/मलप्रवाह महानगरपालिकेच्या मलनिःसारण यंत्रणेस जोडण्याच्या परवानगीसाठी अर्ज करतील.

**3.3** ग्रे पाणी प्रक्रिया संयंत्राच्या गुणवत्ता/क्षमता यासंबंधीचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र महानगरपालिकेच्या संबंधित विभागाकडून घेण्यात यावे व ते इमारतीच्या वापरास परवानगी मागण्यापूर्वी/काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र मागण्यापूर्वी सादर करावे.

**4)** <u>परवानगी देण्याबाबत</u>

**4.1** या उपविधीच्या जोडपत्र 'ब' मध्ये दिलेल्या शर्ती व ग्रे पाण्याच्या पुनर्वापरासाठीच्या उपाय योजनांची पूर्तता केल्यासच, उपविधी लागू असणा-या प्रत्येक इमारतीस औद्योगिक ग्रे पाणी/ग्रे पाणी महानगरपालिकेच्या मलनिःसारण प्रक्रियेत विसर्जन करण्यास परवानगी दिली जाईल.

**5)** ग्रे पाण्याची चाचणी व त्यांचे निकाल

**5.1** औद्योगिक सयंत्राच्या वापरकर्त्याने किंवा परवाना आवश्यक असलेल्या वापरकर्त्याने परवाना मिळण्यासाठी वर्षातून एकदा संयंत्रातून किंवा इमारतीतून विसर्जित केलेल्या औद्योगिक ग्रे पाण्याचा चाचणी निकाल महापालिका आयुक्तांकडे किंवा प्राधिकृत अधिका-यांकडे द्यावेत.

**5.2** उपविधी **5.1** मधील खंडात **(Clause)** विनिर्दिष्ट केलेल्या तरतुदींचे उल्लंघन न करता परवाना मागणा-या वापरकर्त्याने किंवा संनियंत्रित संयंत्र किंवा इमारतीच्या वापरकर्त्याने,

महानगरपालिका आयुक्तांनी लेखी मागणी केल्यास कधीही संयंत्रातून किंवा इमारतीतून विसर्जित केलेल्या औद्योगिक ग्रे पाण्याचे चाचणी निकाल महानगरपालिका आयुक्तांना सादर करावेत.

**5.3** या बाबतीत महानगरपालिका आयुक्तांनी किंवा प्राधिकृत अधिका-याने विहित केलेल्या पध्दतीने अटी व शर्तीनुसार ग्रे पाण्याची चाचणी व निकाल सादर करावेत.

या उपविधीन्वये महापालिका आयुक्त, त्यांचे प्रतिनिधी किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी यांना योग्य वेळी संयंत्राची पाहणी करण्यास प्राधिकार दिले आहेत.

**6)** <u>विसर्जित केलेल्या (पाण्याची) चाचणी करण्यासाठी सूचना</u>

**6.1** महापालिका आयुक्त त्या त्या वेळच्या परिस्थितीचा आढावा घेऊन त्यांना आवश्यक वाटल्यास, या उपविधीच्या पाचव्या खंडात विशद केल्याप्रमाणे औद्योगिक ग्रे पाण्याच्या नमुन्यांची चाचणी करण्याचे आदेश देऊ शकतील व तरी संयंत्र भोगवटादारास लेखी सूचना देऊन चाचणी करण्यासाठी येणा-या खर्चाचे अधिदान करण्यासाठी कळवू शकतील.

**6.2** उपविधीच्या खंड (Clause) (5) मध्ये नमूद केल्याप्रमाणे नियंत्रित संयंत्राच्या भोगवटादारास सूचना प्राप्त होताच त्याने त्यासाठी उपविधी **(4)** मध्ये विहित केलेल्या तरतुदींची पूर्तता करावी.

**7)** <u>ग्रे पाणी पुनर्चक्रीकरण प्रक्रिया केंद्राच्या कार्यान्वितीसाठी परवानगी</u> -

**7.1** महापालिका आयुक्तांकडे प्राप्त झालेल्या ग्रे पाणी चाचणी निकालांच्या आधारे किंवा त्यांच्या सांगण्यावरुन किंवा त्यांच्या वतीने केलेल्या पाण्याचे पुनर्चक्रीत केंद्र आवश्यक त्या गरजा पूर्ण करीत आहेत याची खातरजमा करुन संयंत्र कार्यान्वित करण्यास लेखी परवानगी देतील.

**7.2** भोगवटादाराने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे संयंत्र कार्यान्वित करावे.

**8)** <u>ग्रे पाण्याचे विघटन -</u>

**8.1** स्वतंत्र विसर्जन प्रक्रियेद्वारे इमारतीतील प्रसाधनगृहातील ग्रे पाणी न्हाणीघर व स्वयंपाकघरातील ग्रे पाण्यापासून वेगळे केले जाईल. ग्रे पाणी पुनर्चक्रीकरण संयंत्राद्वारे पुनर्चक्रीत केले जाईल व हिरव्या रंगाच्या (Down take) पाईपद्वारे सुस्पष्टपणे स्वतंत्र टाकीत साठवले जाईल व पिण्याव्यतिरिक्त इतर कामासाठी परत वापरले जाईल. पाण्याची गुणवत्ता पिण्याव्यतिरिक्तच्या पाण्याच्या प्रमाणकानुसार असेल. पुनर्चक्रीत केलेल्या पाण्याची चाचणी सहा महिन्यातून एकदा केली जाईल. जेव्हा महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी विचारणा करतील तेव्हा त्यांना निकाल उपलब्ध करुन दिले जातील.

**9)** <u>ग्रे पाणी विल्हेवाटीसाठी सशर्त परवानगी</u> –

सशर्त स्वरुपाच्या संयंत्रात पाण्याच्या पुनर्चक्रीकरण व पुनर्वापराची सुविधा उपलब्ध असल्यास त्यातील ग्रे पाण्याची विल्हेवाट लावण्यास सशर्त परवानगी दिली जाईल व ती एमपीसीबी **(MPCB)** प्रमाणकातील मर्यादेपेक्षा जास्त नसेल.

**10)** <u>बदलासंबंधी अनिवार्य सूचना -</u>

बदलासंबंधी भोगवटादाराने त्याच्या इमारतीमधून किंवा संयंत्राद्वारे होणा-या ग्रे पाण्याच्या विल्हेवाटीचे परिमाण, स्वरुप व गुणवत्ता तसेच विल्हेवाटीच्या पध्दतीबाबत किंवा आवश्यक पाण्याचा बाहेरुन अतिरिक्त पुरवठा यातील बदलामुळे जर या उपविधींतर्गत जारी केलेल्या परवान्याचे उल्लंघन होणार असेल तर त्याबाबत त्वरित आयुक्तांना किंवा त्यांच्या प्राधिकृत अधिका-यांना कळवावे.

**11)** <u>परवाना/सूचना यांच्या शर्तीमध्ये बदल करण्यासाठी प्राधिकारी</u> -

**11.1** या उपविधीनुसार प्राधिका-यांनी दिलेल्या लेखी सूचना किंवा दिलेल्या परवान्यान्वये आयुक्त किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी संयंत्राच्या, इमारतीच्या किंवा चाचणी अहवालाच्या समाधानकारक पाहणी नंतर रद्द करतील, बदल करतील किंवा अटी घालतील.

**12)** <u>प्राधिकारातील हस्तक्षेप</u> -

आयुक्तांच्या किंवा त्यांचे प्रतिनिधी किंवा प्राधिकृत अधिका-यांबरोबर हस्तक्षेप करण्यास सक्त मनाई आहे.

**13)** <u>सूचना /परवानगीचा बटवडा **(Delivery) -**</u>

या उपविधीच्या आवश्यकतेनुसार सूचना/परवानगीचा बटवडा कायदेशीररित्या केला आहे असे मानले जाईल. जर ती पोचपावतीसह उद्देशित प्राप्तकर्त्याच्या हातात दिली असेल किंवा त्याच्या निवासस्थानी, कामाच्या ठिकाणी किंवा माहिती असलेल्या ठिकाणी पोचपावतीसह पोहचविली असेल किंवा त्यांच्या कुटुंबातील सज्ञान सभासदाकडे दिली असेल किंवा त्यांच्या सज्ञान कर्मचा-याकडे पोचपावतीसह दिली असेल किंवा त्या व्यक्तिकडे नोंदणीकृत टपालाने त्याच्या निवासस्थानी किंवा त्याच्या अलिकडील माहित असलेल्या कामाच्या जागी पाठविली असेल. जर अशा पध्दतीने बटवडा करणे शक्य नसेल तर वर नमूद केलेल्या ठिकाणापैकी एखाद्या ठिकाणी सदर सूचना ठळकपणे चिकटविली असेल तरी सदर सूचनेचा कायदेशिररित्या बटवडा झाला आहे असे मानले जाईल.

**14)** <u>सुधार कार्य -</u>

**14.1** महापालिका आयुक्तांनी किंवा त्यांच्या प्राधिकृत अधिका-यांनी लेखी सूचना पाठविल्यानंतर या उपविधीतील तरतूदींचे उल्लंघन करणा-या व्यक्तिस तपासाच्या दिवशी रु**. 5000/-** दंड आकारला जाईल व तरीही उल्लंघन चालूच राहिले तर प्रत्येक दिवसासाठी सुधार कार्य म्हणून रु**. 100/-** दंड आकारला जाईल**.**

**14.2** पुनर्चक्रीकरण संयंत्र कार्यान्वित न केल्यास **(**चाचणी निर्णयाच्या निर्देशानुसार आणि**/**अथवा प्रत्यक्ष पडताळणीनुसार**,** निरिक्षक किंवा महानगरपालिकेच्या प्राधिकृत अधिकारी यांनी ठरविल्याप्रमाणे**)** प्रत्येक दिवसासाठी रु**. 500/-** किंवा जलजोडणी तोडणे असा दंड केला जाईल**.**

**15)** <u>अधिका-यांचे प्राधिकार पत्र -</u>

**15.1** या उपविधी अंतर्गत विविध कर्तव्ये पार पाडण्यासाठी महापालिका आयुक्त त्यांच्या अधिका-यांना **,** निरिक्षकांना अधिकार **(Power)** प्रदान करतील**.**

## <u>विभाग 'ब' जल प्रोत्साहक उपविधी</u>

**16)** <u>ग्रे पाण्यासाठी स्वतंत्र नळरचना **(Plumbing)** व नविन इमारतीसाठी पुनर्चक्रीकरणाची तरतूद**.**</u>

**16.1** प्रत्येक विकासक**/**बांधकामदाराने इमारतीच्या विक्रीपूर्वी नवीन बांधलेल्या इमारतीत ग्रे पाणी पुनर्चक्रीकरण संयंत्र साठा व पुर्नवापर यासाठी स्वतंत्र नळ रचनेची तरतुद करावी**.**

**17)** <u>ग्रे पाण्यासाठी स्वतंत्र नळ रचना व विद्यमान इमारतीसाठी पुनर्चक्रीकरणाची तरतूद**.**</u>

**17.1** विद्यमान सर्व इमारती**/**निवासी बांधकाम यांनी पुनर्चक्रीत पाण्याचे संयंत्र तसेच त्या अनुषंगाने ग्रे पाणी व त्याच्या पुनर्वापरासाठी पुरेशा स्वतंत्र नळरचनांची तरतूद करावी**.**

**18)** <u>पाण्याचा पुनर्वापर काटेकोरपणे पिण्याव्यतिरिक्त व संपर्करहित **(Non-contract use)** वापरासाठी करावा**.**</u>

**18.1** सुस्पष्टपणे वेगळया **जांभळया** रंगाच्या **(Purple)** पुनर्वापर प्रणालीद्वारे पाण्याचा पुनर्वापर काटेकोरपणे पिण्याव्यतिरिक्त कारणासाठी करण्यात येईल**.** संपर्करहित वापर हा काटेकोरपणे न्हाणीघरात वेगाने पाणी टाकणे **(Flush) ,** झाडे झुडपे यांकरिता ठिबकसिंचन**,** हिरवळीच्या**/**उप पृष्ठभागाचे सिंचन याकरिता करावा**.**

**19)** <u>पिण्यास योग्य व पिण्यास आयोग्य पाण्याची काट जोडणी **(Cross connection)** होता कामा नये.</u>

**19.1** कोणत्याही ठिकाणी पिण्याचे व न पिण्याचे पाणी यांच्या जोडणीचा गुंता होणार नाही. **(Cross connection)** पिण्याच्या पाण्याच्या प्रणालीपेक्षा पुर्नचक्रीत पाण्याच्या प्रणालीचा प्रचालन दाब हा कमी राखला जाईल. जोडणी करताना दूषित पाणी मिसळणे टाळण्यासाठी खबरदारी घ्यावी लागेल.

**20)** <u>पुनर्चक्रीत पाण्याचे मोजमाप</u>

**20.1** पुनर्चक्रीत पाणी हे प्रवाहमापक/जलमापक याद्वारे वेगळया साठवणूक टाकीत साठवण्यापूर्वी मोजले जाईल. प्रवाहमापक/जलमापक हे बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे मोहरबंद **(Sealed)** केले जातील. भोगवटादाराकडून प्रवाहमापक व जलमापकाचे मासिक वाचन होईल व जेव्हा मागणी केली जाईल तेव्हा निकाल उपलब्ध केला जाईल.

**21)** <u>जलकरात सवलत</u>

**21.1** जर महापालिका आयुक्त किंवा त्यांच्या प्राधिकृत अधिका-यांनी प्रमाणित केले की इमारत किंवा निवासी बांधकाम यांनी यशस्वीरित्या पिण्याच्या पाण्याचा वापर **25** टक्क्यांनी कमी केला आहे तर ते प्रसंगोचित कालावधीसाठी **(relevant period )** जलकरात **25 %** सवलत मिळण्यास पात्र होतील. औद्योगिक व निवासी आवारातील वापरलेल्या अतिरिक्त प्रमाणाची बचत होईल. ह्या सवलतीचा प्रत्येक वर्षी आढावा घेण्यात येईल.

**22)** <u>मलनिःसारण करात सवलत.</u>

**22.1** जर महपालिका आयुक्त किंवा त्यांच्या प्राधिकृत अधिका-यांनी प्रमाणित केले की इमारत किंवा निवासी बांधकाम यांनी यशस्वीरित्या पिण्याच्या पाण्याचा वापर **25** टक्क्यांनी कमी केला आहेत तर ते प्रसंगोचित कालावधी **(relevant period )** मलनिःसारण करात **25 %** सवलत मिळण्यास पात्र होतील. औद्योगिक व निवासी आवारातील वापरलेल्या अतिरिक्त प्रमाणाची बचत होईल. ह्या सवलतीचा प्रत्येक वर्षी आढावा घेण्यात येईल.

**22.2** मुंबईतील स्विकारार्ह (स्विकारण्याजोग्या) विकासाला उन्नत करण्यासाठी, बृहन्मुंबई महानगरपालिका, पर्यावरण पुरक गृहसंस्थेचा विचार करत आहे. पट्टी आकारणीच्या आधारे **(Star rating)** विकास आकार महापालिका कर यात सवलत आहे, ज्यायोगे उपभोगत्यास **10** ते **50** टक्क्यापर्यत बदलती सवलत मिळू शकेल. पाणी बचतीच्या कसोटी अंतर्गत, निवासी इमारतीतील ग्रे

पाणी आणि काळे पाणी यांचे पुनर्चक्रीकरण हे पर्यावरणपूरक गृहसंस्थेचा एक भाग आहे. पर्यावरणपूरक गृहसंस्थेमध्ये ग्रे पाणी प्रक्रिया योजना कार्यान्वित करणे ही अनिवार्य अट आहे. आणि पट्टी अकारणी **(Star rating)** मिळण्यासाठी त्यास **25** गुण दिले आहेत. तसेच ग्रे पाणी आणि काळे पाणी यांची विभागणी (वेगळे) करण्यासाठी दुहेरी नळ रचना करणे ही सुद्धा अनिवार्य अट आहे ज्यासाठी **10** गुण प्रस्ताविले आहेत.

**23)** <u>विवाद निवारण</u>

हया उपविधीची अंमलबजावणी करतांना उद्भवणारे सर्व विवाद हे महानगरपालिका आयुक्तांकडे निर्दिष्ट केले जातील जे प्राधिकृत अधिका-यांकडे सल्ला मसलत करुन मिटवतील आणि त्याबद्दल भोगवटादार/बांधकाम व्यावसायिक/विकासक हयांना कळवतील. महानगरपालिका आयुक्तांचा निर्णय हा अंतिम असेल व भोगवटादारांवर बंधनकारक असेल.


परिशिष्ट ‘अ’ - उपविधीमध्ये प्रस्ताविल्याप्रमाणे संकल्पनात्मक ग्रे पाण्याच्या पुर्नवापराची मांडणी

परिशिष्ट ‘ब’ – ग्रे पाणी पुनर्चक्रीकरण केंद्रातून वाहून जाणा-या पाण्याची वैशिष्ट्ये.

विधि-१/मसं-२७२
मसं १९८

अशासकीय परिशिष्ट 'अ' :-

उपविधीमध्ये प्रस्तावित्याप्रमाणे संकल्पनात्मक ग्रे पाण्याच्या पुनर्वापराची मांडणी



**परिशिष्ट 'ब'**

ग्रे पाणी पुनर्चक्रीकरण केंद्रातून वाहून जाणा-या पाण्याची वैशिष्ट्ये –

1) बी.ओ.डी. **-** प्रति लिटर **5** मि.ली. पेक्षा कमी

**2)** पी.एच. **- 6.5** ते **7.5** च्या मध्ये

कृपया हरकती व सूचनांसाठी खालील लिंक किंवा ईमेल आयडीवर संपर्क साधावा –

http://www.linkedin.com//pub/chief-engineer-sewerage-operation-m-c-g/56/6a1/409

dychepnc.so@mcgm.gov.in

chiefengineer.so@gmail.com

che.so@mcgm.gov.in

अस्विकार (Disclaimer)

पिण्याचे पाणी वाचविण्याकरिता, लोकांच्या सहभागासाठी ग्रे पाण्याच्या उपविधींची मांडणी करण्यात येत आहे. ग्रे पाणी उपविधी, निरनिराळया खात्यांच्या संबंधित अधिका-यांच्या समितीने तयार केलेले आहेत व त्यांच्या सर्वोत्तम ज्ञानावर आधारित आहेत.

हया ग्रे पाणी उपविधींना अंतिम रुप देण्यापुर्वी जनतेच्या सूचना / हरकती दिनांक 26.3.2013 पासून 21.5.2013 पर्यंत मागविण्यात येत आहेत.

सदर सूचना/ / हरकती विचारात घेण्याचे अधिकार बृहन्मुंबई महापालिकेने राखून ठेवलेले आहे.